५९८३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९२३



REFBK-0018850
REFBK-0018850

# गावकुसाबाहेरील कविता

वामन निंबाळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८०३४२ ५१०९/
२९२३ १ध५७

मराठी ग्रंथ संग्रहालय
४८५०
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018850
REFBK-0018850

वामन निंबाळकर

# गावकुसाबाहेरील कविता

अस्मितादर्श प्रकाशन, ३७ लक्ष्मी कॉलनी, छावणी, औरंगाबाद.

॥ अस्मितादर्श प्रकाशन : २ ॥

॥ प्रकाशक ॥

प्रा. गंगाधर पानतावणे

अस्मितादर्श प्रकाशन,

३७, लक्ष्मी कॉलनी, छावणी, औरंगाबाद.

॥ प्रथमावृत्ती ॥

२५ मार्च १९७३

॥ सर्वाधिकार ॥

सौ. हिरा निंबाळकर

॥ मुखपृष्ठ व रेखाटणे ॥

भ. मा. परसवाळे

॥ मुद्रण ॥

पं. बं. शेळके

नाथ मुद्रणालय

शारदा कॉलनी, औरंगाबाद.

॥ मूल्य ॥

रुपये चार

शोधते माझी नजर माय आता मी उदास होतो ।
दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत घेतो ।।

---

– वामन

॥ पूर्वप्रकाशन ॥

। अस्मितादर्श । सत्यकथा । प्रतिष्ठान । आम्ही । मागोवा । वैखरी ।
। साधना । मराठवाडा ( दि. अं. ) । मनोहर इ. ।

॥ ऋणनिर्देश ॥

। डॉ. म. ना. वानखडे । प्रा. म. भि. चिटणीस । प्रा. गंगाधर पानतावणे ।
। म. मा. परसवाळे । सुखराम हिवराळे । वि. ए. राजगुरु ।
। त्र्यंबक सपकाळे । सदाशिव निंबाळकर ।

प्रिय वामनराव --

गेली अनेक वर्षे मी तुमची कविता वाचतोय. विशेषतः पाच-सहा वर्षांतील तुमच्या कवितेने स्वतःचे असे स्थान निर्माण केले आहे. या काळात खऱ्या अर्थाने तुम्हाला तुमची कविता सापडली. गावकुसाबाहेरचे दुःख विदारक, जीवघेणे. तेथे माणूस जगत नव्हता. जगत होती उपेक्षा, असाहाय्यता, बहिष्कृतता. हे दुःख मराठी कवितेने कधीच आपलेसे केले नाही. संस्कृतीची उद्दाम गाणी गाणारी परंपरा, माणसाचा शोध घेऊ शकली नाही. म्हणूनच शब्दांचे ढीग, पानात, फुलात, चांदण्यात, सुगंधात भिजू घालणाऱ्या शब्दप्रभुंना जेव्हा तुम्ही विचारता --

**ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीवन**
**विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा ।**

तेव्हा, तुमचा अनुभव, चिंतन आणि शब्दयात्रा, गावकुसाबाहेरील दुःखाचे प्रतिनिधीत्व करीत असते. ते व्यक्तिमनाने टिपलेले दुःख

समाजमनाचा आविष्कार घडवीत असते. तुम्ही अशा संस्कृतीचे वारसदार आहात, ज्या संस्कृतीला स्वतःचे वेगळेपण असूनही तिला अभिव्यक्त होता आले नाही. तुम्ही अशा मातीत जन्मलात, जिला स्वप्ने होती पण ती उभवायची आज्ञा नव्हती. तुमचे आयुष्य असे की, जे स्वतःचे म्हणून जगलेच नाही. तुमच्या कैक पिढ्या इतक्या असहाय्य की, ज्याना हक्काची भाषा बोलताच आली नाही. दुःखाच्या समुद्रात बुडालेल्या तुमच्या-माझ्या पूर्वजांचे हुंदके गावच्या वेशीतच विरले. त्याचा हलकासाही स्वर गावात आला नाही.

– पण युगचक्र बदलले. एका महान प्रेषिताने-युगंधराने, तुमचे-माझे विस्कटलेले, उध्वस्त झालेले जीवन समृद्धीच्या दिशेने नेले. पुरातनत्वाचा – कठोर रूढी-परंपरांचा अहंकार ठोकरून माणसातील सौहार्द्रतेची पूजा करण्यास शिकविले. मला आनंद वाटतो तो ह्याचा की, या सर्व स्थित्यंतरांची-आवर्तनांची, दखल तुमच्या कवितेने घेतली- नव्हे ती एक अंगीभूत प्रेरणा मानली.

तुमच्या कवितेची स्वतंत्र अशी भाषा आहे. ती दास्य नाकारते-मनाचे, माणसाचे. ओसाडीतील मूक शब्दांना कधी तरी वाचा फुटेल असा कवी केशवसुतांनी आशावाद व्यक्त केला होता ; त्याचे प्रत्यंतर दलित कवितेच्या रूपाने समर्थपणे येऊ लागले आहे.

वामनराव, तुमची कविता कुणाला उद्दाम अथवा आव्हान देणारी वाटेलही. कारण तुमची अनुभवांची जातच वेगळी आहे. चिखलात रुतलेल्या झोपड्यात विसावणारे; फाटक्या गोधडीत थंडी, वारा लपेटणारे ; तळहातावर भाकरी खाणारे अनेक रक्तहीन

चेहरे, तुमचे सांगाती आहेत. अशा निस्तेज रक्तहीन चेहऱ्यांनी व अनवाणी पायांनी आकाश कवेत घेण्याचे स्वप्न पाहिले तर तो उद्दामपणा वा आव्हान ठरेल का ? 'जात कशी असते, कुठे असते?' असे धुरासारखे तरंगत जाणारे प्रश्न कितीकांना ओरबाडतात ? गावकुसाआतील तीक्ष्ण नजरा, गावकुसाबाहेरील नजरांना कितीसे आपलेपण देतात ? हे सारे सारे माणुसकीच्या संदर्भात मौलिक आहे. म्हणूनच तुम्ही मनूच्या वारसदारांना, या मेलेल्या मातीतून समर्थ माणसे जन्माला येतील, असे बजावून सांगितले आहे. मला तर हे आव्हान नव्या माणसाच्या निर्भय जीवनावरील श्रद्धाच वाटते.

मायबहिणींच्या अब्रूची धिंड पाहून तळमळणारे तुमचे मन सूर्यबळाची आराधना करते राजसभेत द्रौपदीची बेअब्रू झाली नि कवी-लेखकांना युगाचे वरदान लाभले. इथे नांदणाऱ्या लोकशाहीत कुणाची माय तर कुणाची बहीण नागवी केली गेल्याच्या बातमीनेच दिवस उजाडतो. तिच्यासाठी मात्र कुणी 'कृष्ण' धावून येत नाही. धावतात फक्त दु:शासनच, धिंडीची दौंडी पिटण्यासाठी. मग आदर्शाचे पाठ देणारी ही संस्कृती स्वत:ची कशी वाटावी ? वामनराव, तुमच्या कवितेने अशा दंभाचा स्फोट केला आहे. पोथीनिष्ठ मनोवृत्तीला तुम्ही सुरूंग लावला आहे तुमची कविता हा देश सोडून जाण्याची भाषा बोलत नाही. कारण या देशाचा ऋणानुबंध. मात्र, मुखवटे धारण करणाऱ्या संस्कृतीनिष्ठांना ती जागी करू पाहाते. म्हणूनच तुमच्या कवितेतील क्षोभ व अस्वस्थता विलक्षण आहे.

तुमच्या कवितेतील वास्तव दाहक आहे. म्हणूनच ते कटु व कठोर वाटण्याची शक्यता आहे. मराठी कवितेला हे नवे आहे.

एखाद्याला, आत्मप्रतिष्ठेची भाषा; वक्तृत्वाची भाषा वाटणे अगदीच गैर नाही. पण वक्तृत्व हे कलाबाह्य मूल्य मानले तर, थोर थोर कलावंतांना बहिष्कृत करावे लागेल. वामनराव तुमच्या ' गावकुसाबाहेरील कवितेने ' न मराठी साहित्याला काही तरी आशा-जनक दिले आहे. दलित साहित्याचा तर तो एक महत्वपूर्ण टप्पा आहे, यात शंका नाही. तुमची कविता अधिक सतेज होवो हीच कामना!

दि. २५ मार्च १९७३ — गंगाधर पानतावणे
औरंगाबाद.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८५०
संदर्भ शाखा

## शब्द

शब्दांनीच पेटतात घरे, दारे देश
आणि माणसेसुद्धा·
शब्द विझवतात आगही
शब्दांनी पेटलेल्या माणसांची.
शब्द नसते तर पडल्या नसत्या
डोळ्यातून आगीच्या ठिणग्या,
वाहिले नसते आसवांचे महापूर,
आले नसते जवळ कुणी,
गेले नसते दूर-
शब्द नसते तर.

# शब्दप्रभूंनो !

शब्दप्रभूंनो !
तुम्ही रचलीत महाकाव्ये सोन्याचा घास खाणारांची,
वाऱ्यासोबत चालणारांची, भरजरी वस्त्र नेसणारांची,
आकाशात राहणारांची.
चांदण्यात न्हाऊ घातली तुम्ही
तुमची कविता.
भिजू घातलेत शब्दांचे ढीग,
पानात, फुलात, सुगंधात, मदिरेच्या कैफात,
ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीवन
विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा.
त्यांच्या रक्ताळलेल्या पावलांना, जळणाऱ्या अश्रुला
स्पर्शला नाही तुमचा कविताशब्द.
शब्द पेरलेच नाहीत तुम्ही
या माणसांच्या माणुसकीसाठी,
यांच्या रिकाम्या पोटासाठी,
वळ उठलेल्या पाठीसाठी.
ह्या कोलमडणाऱ्या झोपडयांना टुण्या लावल्या नाहीत
तुमच्या नजरांच्या.
अरे ! यांनीही पाहिले आहे भाकरीचे रूप
पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रात.
या गळणाऱ्या चांदण्यात यांचे उध्वस्त जगणे
कळवळली नाहीत कशी तुमची मने ?
कसे लिहिले नाही तुम्ही यांच्या आसवांचे गाणे ?

## आयुष्य

नाकाच्या शेंड्याने सोलणारे स्वामित्व तुमचे
सारे बेगुमान हुकूम खांद्यावरून वाहताना
उन्हाळ्या-पावसाळ्याच्या पखाली रिचवत होतो
तरी
आयुष्यभर पेरलेलं दारिद्र्यच उगवत गेलं.
न थांबणारे पाय गरगरत राहिले
घाण्याच्या बैलासारखे.
रिचवत असता घामाचेही लोट
तोंडावाटे शब्दाला मनाई
बाळलेले हात पसरतच राहिले तुमच्यासमोर.
तेव्हा ते छाटले गेलेत – बेमुर्वतखोरपणे.
....तरीही आयुष्य वेचतच गेलो
तरीही आयुष्य वेचतच गेलो.

## चेहरे

शून्यात डोळे खुपसून बसतो
उत्खनन करीत, रोजच्या रोज.
अिथे आढळतात लाख, लाख चेहरे
कोळशासारखे काळे, घामेजलेले,
कोमेजलेले,
वाटतात हवा खाऊन जगणारे,
सकाळ, सायंकाळसाठी मरणारे,
यांच्या हातात असतात निखारे
दिसतात पाऊलेसुद्धा निखाऱ्यावर.
यांच्या श्वासात
उधाणत असते .... व्यथा
चालण्याची तऱ्हा यांची वेगळी भासते
कारण यांच्या पाऊल-ठशांवर रक्त
गळत असते.
इवल्याशा यांच्या नजरेत दुःखाचे
डोंगराएवढे बुब्बुळ वळवळत असते
असे हे रक्तहीन चेहरे वाहताहेत
अनंत काळापासून.

## अंधकार

अंधकार आहे माझ्या चोहिकडे
बुबुळाच्या कप्प्यातील चेहरे तर
केव्हाच डुबलेत काळोखात.
त्यांच्या आतल्या कप्प्यात
समुद्राचे वादळ आहे, हे कसे दिसेल ?
त्यांच्या आवाजालाही आज वाट नाही
मग कसे ऐकू येतील त्यांचे अनावर
हुंदके ?

## घडपड

अनवाणी पाय, तुडवलेली वादळी वाळवंटे,
उद्ध्वस्त मन,
रक्ताळलेल्या स्वप्नांचे ढीग.
आकाशकवेत घेण्याची
धडपड, हात
धावताहेत सोबतीला
दिवस-रात.

# वर्तुळवाटा

वर्तुळलेल्या पावलांची
ही पाऊलवाट
थिजलेला, भिजलेला खडान् खडा
हिचा सारा काठ,
उभा कसा, कुठे राहू
माझा तोल सावरत नाही
पडेल जाऊन तोंडघशी
रक्त सारे वाहात राही,
त्या रक्ताचे होतील डाग
तसा मी कुढत राहीन.
जन्मभर पाहता, पाहता
आसवांचे ओझे वाहीन.
दोन पाय लुळे माझे
पाय झाले सागरलाटा
काळोखात डुबलेल्या
वर्तुळलेल्या वर्तुळवाटा.

## दिवस, रात्र व क्षण

गोधडया लरेटतात येथल्या थंडोला
उन्हात वाळते कातडे अंगाचे.
पावसाळा कोसळतो अंगावर
आणि चिखल रततो झोपडया-झोपडयामधून.
तेव्हाच अर्धमेला असतो एखादा जीव
कुठल्यातरी झोपडीत भाकरीने, तापाने वा क्षयाने,
येथील प्रत्येक क्षण विव्हळणारा.
येथले दिवस असेच उजाडतात, मावळतात
गोधडीत, वाळलेल्या कातडयात आणि
कोसळणाऱ्या अंगावर,
कारण येथल्या क्षणालाही उसंत नसते
घास गिळायला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 80382 विः काव्य
क्रमांक 2923 पो. विः गद्य

## कुणीही रडले नाही

तुला स्मशानात पोहचवून
आलो असताना
मीही मेलेलाच होतो ....
....रस्त्यावर मेलेल्या कुत्र्यासारखा.
मात्र तेव्हा दिंडी
वाजली नव्हती अन्
कुणीही रडले नाही
माझ्याशिवाय ....

## माझा मृत्यु

आकाश गळत असतानाचा माझा मृत्यु
झोपडपट्टीत.
अनंत दुःखाची ठिगळं जोडलेले जीवन
जगणाऱ्यामधील मी व माझा मृत्यु
माझं प्रेत नेलं जातं दहनासाठी,
जेथे नसते साधी कोरडी जमीन मिळत
चिखलातील माझं दहन अर्धकच्चं.
पुन्हा एकवार मरतो मेल्यावर
जगत असताना जसा मेलो कितीदा,
माझा जगताना अन् मेल्यावरचा
शेवट सारखाच.

या मनुच्या देशात म्हणतात,
'अस्पृश्यता मी जन्मताच सोबत आणली'
अन् मेलो तेव्हा सोडूनही गेलो का प्रेतावर ?
म्हणून मला मिळत नाही कोरडी जमीन,
होतं माझं दहन चिखलात अर्धकच्चं
कारण माझा मृत्यु आकाश गळतानाचा.

# झडीतले दिवस

एखाद्या दिवशी सूर्यच असा उगवतो
की त्याचेही डोळे डबडबतात.
तेव्हा घरातल्या चुली असतात बधीर,
त्यातील निखारा राखेत थंडावला असतो.
आणि असते गोधडीतील पोट
अंधारात लपेटलेले पाठीला सोडत करीत.
किलबिलणाऱ्या जीवांची भाषा
डोळ्यातून सांडत असते.
फरकुटातील वात्सल्य चिपाड झालेले असते
आणि कोपऱ्यातील झोपडीचा सावलीघर
आकाशाबरोबर कोसळत असतो.

॥ गावकुसाबाहेरील कविता ॥

## दान

भाकरीचे दान माझ्या जन्माला
नुसत्या भाकरीसाठी.
रोजचा सूर्य उगवतो माझ्या पाठीवर, डोक्यावर
मावळतो उसासे सोडीत अंधारासहित.
सारा जन्म घामाने भिजूनही
हुंदक्याबरोबर घास गिळताना
हात मात्र कोरडाच.
डोळ्यांना पाहिले रानावनातील
येथले हिरवेपण,
मी मात्र भकास, उजाड
वणवण.

## आठ जून अडुसष्ट, औरंगाबाद

धुराचे लोळ पोटात घेत असलेले आकाश,
अन् नग्न सायंकाळ माणुसकीचे वस्त्र फेडलेली.
घराघरावर, रस्त्यावर माणसे गच्च.
थांबलेले श्वास त्यांचे, लहान मुले चिप्प.
अनंत वेदनांचे ओझे घेऊन डोळे
जळत होते कितीएकाचे,
अनेक होते उदास; काही मत्त.
रात्र झाली तरी वेदना जळतच होती,
कधी नव्हती एवढी विराण, वेळ जात नव्हता.
नंतरचे दिवस उजाळले घरातच
भित्रे डोळे भिरभिरले पाहण्यासाठी
माणसाने केलेला माणुसकीचा चक्काचूर
तेव्हाच पाहिलेत अनेक अबलांच्या डोळ्यात
आसवांचे महापूर.
शब्दात बसणार नाहीत एवढ्या कथा आणि व्यथा
सांगताना फुटेल उर
कारण
तिथे खचला माणूस नि तुटले कडे माणुसकीचे.

## काळोख


आयुष्य उगवते, प्रकाशते, तेजाळते म्हणतात
परंतु मी तर त्या गर्द काळोखाचाच एक भाग.
माझे अश्रु या काळोख्या रात्रीत विरघळतात
हसू लोपले असते
कित्येक वर्षाचा अंधार माझ्या कानात ओतलेला
येथील माझे सामाजिक जगणे, मरणे
काळोखाच्या भिंतीतील माझे आर्त रडणे,
घेरलेले उभे आयुष्य डोळ्यात
झालेली आसवे प्यायल्यानंतर
तेथे उरतो फक्त गर्द काळोख माझाच एक भाग
अन् तोही रडत असतो उदासवाणा.

## वारसा

सूर्य उगवतो या झोपड्यात अंधार घेऊन
रात्र होते तेव्हा यांची स्वप्ने उन्मळून
पडतात.
अंधाराचे साम्राज्य यांच्या उशा-पायथ्याशी,
पाठीशी, पोटाशी. गाडग्या-मडक्याशी,
यांच्या चुलीला जाळ माहीत नव्हता.
नव्हते यांच्या हक्काचे पाणी.
दगड, धोंडे खात जाई चुकलेला कुणी.
हरवून गेले होते यांचे अस्तित्व आणि मीपण,
व्यथाही यांच्या लिलावात होत्या.
शब्द नव्हते यांच्या मालकीचे
मात्र घाम, अपमानाचा वारसा यांचा होता.

## मुखवटे

आज पाहताहेत गावकुसाबाहेर सगळे
चिकटलेल्या डोळचांनी.
यांच्या बुबुळाआड जुनी लक्तरे मात्र
अजूनही लोंबताहेत.
यांचे मुखवटे ठिसूळ आणि कल्हई केलेले.
यांच्या निघणाऱ्या शब्दांच्यामागे
विषाचे सागर उसळतात
आणि पेरत जातात यांचेच विचार मेलेले.



## पिंपळपारावर

काळोखाने धुतलेली वाट
जवळील पिंपळपारावर बसलेले
माणसांचे नुसते चेहरे
अंधारातून पोटात अंधार घेऊन
जाणारे वाटेने दोन पाय
पारावर बसणाऱ्यातील एक गुरगुरतो.
'माजले म्हार नाही करत जोहार'
ऐकलेले शब्द तसेच झेलतो वाटेने जाणारा
म्हणतो मायबाप नाही दिसले हो अंधारात
नम्र शब्दांनीही दुखावतो त्यांचा स्वाभिमान
म्हणून म्हणत उठतात सारेच, 'उलटे बोलतो काय ?'
मग् बडवतात, खाली कोसळतो.
बुद्धं सरणम् गच्छामि
धम्मं सरणम् गच्छामि
संघं सरणम् गच्छामि
आणि आठवते त्याला पिंपळाच्या झाडाखाली
बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली.

## स्वप्न

अंधार पचवुनि अवघा
दुःखाचे ओझे पाठी
त्या गावकुसाबाहेरी
ते जगती दुसऱ्यांसाठी.
लक्तरे लोंबती देहा
पोटास कुर्तडे भूक
पायातील भेगा हसती
डोळयात आसवे मूक
पोरक्या झोपडयांमधुनी
संसार असा अनवाणा
फुटलेल्या मडक्याकाठी
अन्नाचा नसतो दाणा
काळास घेऊनी स्कंधी
तो तरी कितीसा जगतो
गावात कधी घर यावे
स्वप्नात दुभंगून जातो.

## जात

कळत नव्हते तेव्हाच कळले
आपली जात खालची
बापाला मारली होती लाथ पाटलाने
आईला शिवी.
त्यांनी केल्या नव्हत्या माना वर
मात्र माझ्या काळजात घर
शाळेची पायरी चढलो
तेव्हाही कळले आपली खालची जात
मी बसायचो बाहेर सारेच बसायचे आत.
अंगावर तरारून उभे राहात काटे
डोळ्यात मावत नसत आसू
त्यांच्या शिवीलाही आमच्या तोंडी असावे हासू
काहीच कळत नाही
हेच ऐकत आलो, शिकत आलो,
माणसाएवढा माणूस झालो.
अजून तरी कळले नाही
जात कशी असते, कोठे असते
दिसत नाही म्हणून का ती माणसांच्या अंगात वसते.
सारेच प्रश्न धुरासारखे तरंगत जातात
आणि विचारांची तडफडत असते वात
पण कळत नव्हते तेव्हा कळले
आपली खालची जात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८५०

## शिरसगाव व बामणगाव

मायबहिणींनो ! तुमच्या नेसुच्या महावस्त्रांचे रंग
आज पूर्वेला चढलेले मला दिसताहेत.
तो येणारा सूर्य घेऊन येणार आहे
तुमच्या डोळ्यातील अंगार.
ते उसळणारे समुद्र
तुमच्या डोळ्यातील आसवांच्या लाटांचे
रौद्रगीत गाणार आहेत.
तुमच्या महावस्त्रांना स्पर्शणारे हात
त्या अंगाराने भस्मसात होणार,
बुडणार समुद्राच्या तळाशी त्यांची राख.
कारण येणारा सूर्य ते महावस्त्रांचे रंग
तुमच्या धगधगत्या आसवांच्या रंगात
बुडवून आणणार आहे.

## माय

जसा दिस डुबून जाई काळोखाचे राज्य असे
आम्ही बसू दरवाज्यात झोपडीत साधा दिवा नसे
घरोघरी दिवे लागत चुलीलाही जाळ लागे
भाकरी जात बडविल्या कुठे चून कुठे वांगे
नाकात जाई वास त्याचा पोटात असे अंधार सारा
तसे येई भडभडून आसवांच्या डोळ्यात धारा
अंधाराला चिरत तेव्हा एक सावली जड येई
डोई तिच्या भारा असे चालताना तोल जाई
काळी, काळी कृश देह ती असे माझी माय
वणवण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय
वाट पाहात बसू कधी तिची सारे आम्ही भाऊ
मोळी नसे विकत तेव्हा भुकेलेले झोपी जाऊ
एकदा काय झाले कसे आम्हा काही कळले नाही
माय आली पाय बांधून भळाभळा रक्त वाही
चावला साप मोठा काळा दोन बाया होत्या सांगत
फणा काढून मारला त्याने हळूच गेला निघून रांगत
माय पडली धरणीवर गंडे झाले, मंत्र झाले, वैद आला
दिवस निघता, निघता तिच्या देहातून प्राण गेला
हंबरडा फोडला आम्ही, तो विरला वाऱ्यावर
माय तरी सोडून गेली चिल्लेपिल्ले वाऱ्यावर

शोधते माझी नजर माय, आता मी उदास होतो
दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत घेतो

## प्रदर्शन

जळलेले आयुष्य पुन्हा
निखाऱ्यासारखे फुलवायचे
म्हणून प्रकाशाची पायवाट
मी जवळ केली आहे
आता मला जाळणारे, त्याच
मार्गाने जाणारे असतील तर
त्यांच्या आयुष्याची राख आढळेल त्यांना
कारण यापुढील माझा हात
जळत्या निखाऱ्याचा.
म्हणून मी म्हणतो,
'तुमच्या कुजट, कुबट संस्कृतीचे
ढबढबलेले ढोल कोठवर वाजवाल ?
कोठवर फेडाल नेसू
माझ्या मायबहिणींचे,
आता तर तुमच्या अब्रुचे धिंडवडे
तुम्ही पाहणार तुमच्याच डोळ्यांनी
कारण तुमच्या संस्कृतीच्या चिंध्या
सडल्या, गळून पडायल्या लागल्या
म्हणून तुमच्या इज्जतीचे उघडे, नागडे
प्रदर्शन उद्या होणार आहे'

# इतिहास

मनुच्या वारसदारांनो ! हजारो वर्षापासून पाहाताहोत आम्ही
नग्न सांयवेळा आमच्याच.
गावकुसाच्या बाजुला चार, सहा झोपडयात
जळताहेत आमची असंख्य कलेवरे
ज्यांना तुम्ही जाळले, तुमच्या नादान विचारांनी
आम्ही वेशीबाहेर जन्मलो
त्याची खंत तुम्ही केली नाही.
पाण्याच्या थेंबासाठी तुडवले आहेत.
कितीअेक उन्हाळे पायाखाली
तेव्हा तुम्ही कधीही माणूस झाला नाहीत.
आमची प्रेते कुत्र्याने खाताना
पाहिलीत आम्ही डोळाभर
कितीक वर्षे बुजणार नाहीत
शरीर – मनावर असंख्य वळ
रस्त्यावर उघडी-नग्न फिरली आमची लाज
टाहो फोडूनही कुणीच ऐकला नाही आमचा आवाज
खूप सोससोसला आजवर
गावात कधी आलेच नाही आमचे घर
आमच्या डोळयातील महापूर पाहून
आजवर तुम्ही टाळया पिटल्यात अत्यानंदाने,
कुणीचीही झाली नाहीत
एवढी बेचिराख केली आमची मने,
ज्याला नाही अंत

निखारे पचवलेत आम्ही
आणि निघालो तेजाळून
हिमालय रिचवला पोटात
तुमच्या दानवी कृत्यांचा
तरी पेटत्या मशाली धरूनच उभे होतो
तुमची लाज राखायला आणि घरे
मात्र आमच्या अस्तित्वाची काढायला धिंड
नाही डगमगला तुम्ही कधी
मनुच्या वारसदारांनो ! पण लक्ष्यात ठेवा
जगात राहील डार्क स्ट्रीट
आपल्या उपहासाची कथा सांगत
अरे ! वाहताहे अजूनही ताजे रक्त
शंबुकाच्या शिरच्छेदाचे,
नेटाला झोपवलेल्या टेबलावरचे
न मिटणारे रक्त डाग,
तुम्ही कधी पाहिलेच नाहीत
आमच्या सावल्यात एक होऊन
अनंत वर्षापासून रचलेत तुम्ही
माती, दगडांचे ढीग आमच्या मेंदुंवर
विश्वास ठेवा – कदाचित
ह्याच मेंदुतुन बाहेर पडतील असंख्य ठिणग्या
आत्मकवचासाठी

आज होणार आहे क्रांती
आमच्यातील प्रचंड शक्तीने पेट घेतला आहे.
त्याचा होणार आहे स्फोट.
तराटून फुगलेत आमचे स्नायु
जे बोलताहेत आमच्यातील स्वत्वाची भाषा
ते सारे एकत्र येणार आहेत
आणि गर्जणार आहेत जयजयकार क्रांतीचा, माणुसकीचा
उद्याचा इतिहास आमचा आहे
आणि इतिहास लिहिणाराही,
आमचे आहे ते भरतील रक्ताने मळवट
सौभाग्याचा अन्
अर्भकाची कलेवरे फेकतील या वादळात
माणूस म्हणून उभे राहण्यासाठी
त्यांचे स्वागत असो! स्वागत असो!



## रस्ते

बसल्या जागी
रक्ताचे शब्द ओकून कधी भागत नसते
तुम्हालाच तुमचे रस्ते शोधायचेत
ह्या वाळवंटातील ओॲसिसच्या जागा.
हे अफाट रस्ते, त्यावरील बागा,
भिऊन कसे चालेल ?
हे सारे करावेच लागेल.
कुणी कुणाच्या मदतीला जात नसतो.
तुमची तोंडे एकाच दिशेने करा.
आणि तेथवर चालत जा.
हातात हात घालून सारे
सामर्थ्याचे गीत गा.
हिशेब चुकते केल्याशिवाय
सोड कधी होत नसते
रक्ताचे शब्द ओकून कधी भागत नसते
कुणी कुणाच्या मदतीला जात नसते.

## दुःख

माझ्या दुःखाची जात वेगळी आहे.
अंधाराचे हुंदके, प्रकाशाचे उसासे
माझ्या दुःखापुढे फिके पडतात,
फिके पडते विरहाचे गीत
जातीजातीच्या भिंतींचे रिवाज, रीत
तुच्छतेचे वलय मला खाऊन टाकते
तशी व्यथेची जखम भरभरून वाहे
माझ्या दुःखाची जात वेगळी आहे.

## आरसा

फोडायचा आहे तुला तुझ्या समोरील आरसा
किती विद्रूप दिसते तुझे रूप त्यात
डोळ्यात आलेल्या आसवांचे रक्त होऊ दे
पुढे पसरणारे हात गळून पडू देत आणि
आकाशाला कवेत घेऊन करकचून टाक
गुडघ्यात वाकणारे पाय
पाठीवरचे ओझे भिरकावून दे गगनात
भिरकावून दे विद्रूप शरीरावरची जीर्ण चिंधी
तुझी झेप आकाशभर हवी
वेगवेडा हो अन् घे दाही दिशांचा शोध
मग तेथे आटळेल तुला तुझे सुंदर प्रतिबिंब
मात्र फोडायचा आहे तुला तुझ्या समोरील आरसा

## जपून ठेवले आहे

माझ्या हृदयात मी जपून ठेवलीत
पडकी घरे, कौलारू झोपडचा
ती मातीची उदासवाणे हसणारी खिडारं
ती पडलीत साऱ्या जीवनाची राख घेऊन
त्यातील पणत्या, चिमण्या भकभकत्या
काजळ ओकणाऱ्या
त्या विझल्या तेथील अन्नूचे नेसू फेडायला
उघडचा, बोडक्या, रिकाम्या, टिचलेल्या
फुटलेल्या मातीच्या घागरी, भांडी
राहिलीत तुमच्या संस्कृतीची दुर्गंधी
पसरविण्यासाठी.
मी जपून ठेवलीत
गावकुसाबाहेरील डोळचात न मावणारी
फाटलेली अनंत हृदये
कानाचे पडदे फाडणारे मायबहिणींचे
आक्रोश मी जपून ठेवलेत
आणि त्या चिमण्या बाळांच्या किकाळचा
चिरत गेलेले बापांचे चेहरे,
सारं मी जपून ठेवले आहे हृदयात.

## इथे सदाचे मरण

जातो सागर वाहून
डोळा ओला शब्द आत
कळा छातीत रूतती
लुळा ओठावरी हात...

मैलोगणती पुढती
आहे प्रवास अनंत
कुठे काटचांशी पाऊले
नसे आगीलाही अंत...

पाय मृत्युच्या दारात
आहे थांबून सरण
तिरडीशी टांगलेले
इथे सदाचे मरण...

REFBK-0018850
REFBK-0018850

## काळोखात बुडालेली राने

फरपलेले चेहेरे शेतांचे
तसे माणसांचे
दुभंगलेली जमीन, मने
आकाशातून भक्ष्याच्या शोधात फिरणाऱ्या घारी, कावळे
झपाटलेले रस्ते उदासवाणे.
सारे जीवन दुष्काळून ठेवलेले वेशीबाहेरच्या
माणसांचे, काळासारखे माणसानेच.
पाठीवरची बिऱ्हाडं त्यांचीच विंचवासारखी
नजरेत त्यांच्या ओल आलेली भुकेने
रस्ते अनेक पायवाटांनी चहुकडे जाणारे
उन्हे शीळ घालीत गात आहेत मृत्युचे गाणे
फरकाटून, चिंधीतून लोंबत आहे कातडी होरपळलेली
त्यात चिपाड झालेले तान्हे
कुटुंबाचा फर्ता
कंबरेत मोडलेला झाडागत
भरदिवसा पाहतो फाजव्यांचे थवे, काळोखात बुडालेली राने.

९८८५०

## उद्याचा सूर्य

मला पहाटेची स्वप्ने पडू लागली आहेत
या गावकुसाबाहेरचा हा काळोख मावळणाराहे
उजाडल्यावर आमच्या ओठातील प्रकाशगीताचे
स्वर, दाही दिशांना धुंद करणार आहेत.
असे सारे एकत्रित या,
हातात हात घालून प्रकाशाचे गीत गा.
तो दूरून दिसणारा प्रकाशकिरणच
उद्याचा सूर्य होणार आहे
त्यासाठी एकत्रित या, तुमचे एकमेकात गुंफलेले हात
हा अंधाराचा पर्वत फेकून देऊ शकतील.
मला पहाटेची स्वप्ने पडू लागली आहेत.

गावकुसाबाहेरचे दुःख विदारक– अस्वस्थ करणारे
तेथे माणूस जगत नव्हताच
जगत होती असहाय्यता, उपेक्षा नि जीवघेणी वेदना
हे दुःख मराठी कवितेने कधी आपलेसे मान[illegible]
संस्कृतीची उद्दाम गाणी गाणारी परप[illegible]
माणसाचा शोध घेऊच शकली नाही
शब्दांचे हीग पानात, फुलात, चांदण्यात
सुगंधात भिजू घालणाऱ्या
शब्दप्रभुंना म्हणूनच निंबाळकर विचारतात
' ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीव[illegible]
विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा
ही वेदना अर्थपूर्ण आहे. कोंडी फोडणारी आहे
म्हणूनच जीवनवादी आहे
निंबाळकर ती कमालीच्या तटस्थतेने शब्दबद्ध करतात